.

# बातमीपत्र

## पोलीस आयुक्तालय,सोलापूर शहर

### माहिती कक्ष, दिनांक २४ फेब्रुवारी २०१९

### जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| गुरनं. व कलम | : | १२३/२०१९ भादंविसक २७९,३०४-अ,३३८ मोटार वाहन अधिनियम १८४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ .ठिकाण | : | १७/०२/२०१९ रोजी ०७.३० PM वा चे सुमारास, मार्केडेय चौकातील अरकाल यांचे घरासमोर सोलापूर |
| गु. दा. ता.वेळ | : | २३/०२/२०१९ रोजी ११.३४ PM वा |
| फिर्यादी | : | संदिप दत्तात्रय वडजे,वय-४३ वर्ष ,रा.घर.नं.६८३,गवंडी गल्ली,उत्तर कसबा,बाळीवेस सोलापूर |
| आरोपीचे नांव | : | ऑटोचा रिक्षाचालक रिक्षा क्रं.एमएच-१३-सीटी-१०५७ वय-३६ वर्ष |
| हकिकत | : | यात हकीकत अशी की, बाजुस नमुद तारखेस वेळी व ठिकाणी,यात फिर्यादीचे वडील दि.१७/०२/२०१९ रोजी ०७.०० वा चे सुमारास त्याचे ताब्यातील होंडा कंपनीची शाईन मोटारसायकल क्रं.एमएच-१३-ए.एम-९२८२ या मोटारसायकलवरून संत तुकाराम चौक येथील मिस्तरी यांचेकडे जातो म्हणुन कारखाना येथुन बाहेर पडले असता तेथुन फिर्यादीचे वडील मोटारसायकलवरून जोडबसवण्णा चौकाकडे जात असताना मार्केडेय चौकातील अरकाल यांचे घरासमोर आले असता एक अँटो रिक्षा क्रं.एमएच-१३-सीटी-१०५७ हा रिक्षाचालक भरधाव वेगाने येवुन फिर्यादीच्या वडीलांचे मोटारसायकलीस पाठीमागुन जोराची धडक दिल्याने त्यांना गंभीर दुखापत झाल्याने त्यांना मार्केडेय रूग्णालय येथे औषधोपचाराकरीता दाखल केले त्यानंतर दि.१९/०२/२०१९ रोजी फिर्यादीचे वडील उपचारा दरम्यान सकाळी ०७.०० वाजता मरण पावले आहे.म्हणुन सदर ऑटोरिक्षाचालकाविरूध्द विरूध्द तक्रार आहे फिर्यादी हा त्याचे वडिलांची रितीरिवाजाप्रमाणे अंत्यविधी करून आज रोजी घराबाहेर पडुन उशीरा तक्रार देत आहे **तपास:- पोसई/कांरडे** |

### जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| गुरनं. व कलम | : | ८०/२०१९ भादंविसक ३२४,५०६ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ .ठिकाण | : | २३/०२/२०१९ रोजी ०२.१५ वा चे सुमारास, मंगळवार बाजार सोलापूर |

| | | |
|---|---|---|
| गु. दा. ता.वेळ | : | २३/०२/२०१९ रोजी १२.४९ PM वा |
| फिर्यादी | : | उमरफारूक इरफान बागवान,वय-३१ वर्ष ,रा. ९४११ जोडभावी पेठ, मंगळवार बाजार सोलापूर |
| आरोपीचे नांव | : | आलम ऊर्फ शाहरूख इसाक तांबोळी रा. सरवदे नगर,एमआयडीसी सोलापूर |
| हकिकत | : | यात हकीकत अशी की, बाजुस नमुद तारखेस वेळी व ठिकाणी,यात दि.२३/०२/२०१९ रोजी पहाटे ०२.१५ वा चे सुमारास मी माझ्या हातगाड्यावर व्यवसाय करीत असताना माझ्या ओळखीचा आलम उर्फ शाहरूख इसाक तांबोळी रा. सरवदे नगर,एमआयडीसी सोलापूर याने चिकन बिरयानी मागितली त्यावर मी जेवण संपले आहे असे म्हणाल्यावर त्याने चिडुन माझ्या हातगाड्यावर असलेला कांदा कापायचा चाकु उचलुन घेवुन माझ्या उजव्या हाताच्या अंगठ्यावर वार करून जखमी करून तेथुन पळुन गेला आहे **तपास :-** पोहेकॉ/ ७०२ गायकवाड |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| गुरनं. व कलम | : | १४८/२०१९ भादंविसक ३२३,३४,४९८-अ,५०४,५०६ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ .ठिकाण | : | १०/०१/२००७ रोजी ०१.०० PM वा चे सुमारास, मड्डी वस्ती कुमठेगाव सोलापूर |
| गु. दा. ता.वेळ | : | २३/०२/२०१९ रोजी १०.५२ PM वा |
| फिर्यादी | : | सौ.रेहाना लतिफ शेख,वय-३२ वर्ष ,रा.कुमठेगाव जामे मशिद जवळ उत्तर सोलापूर |
| आरोपीचे नांव | : | १) सासरे - मौलाली अब्दुल शेख रा. मड्डी वस्ती कुमठेगाव सोलापूर<br>२) जहिराबी मौला शेख रा. मड्डीवस्ती कुमठेगाव सोलापूर<br>३) लतिफ मौला शेख रा. मड्डीवस्ती कुमठेगाव सोलापूर<br>४) जाऊ - सौ.जमिला ईस्माईल शेख रा. मड्डीवस्ती कुमठेगाव सोलापूर |

| | | |
|---|---|---|
| हकिकत | : | यात हकीकत अशी की, बाजुस नमुद तारखेस वेळी व ठिकाणी,दि.१०/०१/२००७ रोजी लग्न झालेनंतर सुमारे दोन महिन्यापासुन ते दि.१४/०१/२०१९ पर्यंत वेळोवेळी मला माझे पति १) लतिफ मौला शेख २) जहिराबी मौला शेख (सासु) ३) मौलाली अब्दुल शेख(सासरे) ४) सौ.जमिला ईस्माईल शेख (जाऊ) सर्व रा.मड्डीवस्ती कुमठेगाव सोलापूर यांनी संगणमत करून मला तुझ्या माहेरकडील लोंकानी लग्नात मानपान दिला नाही, भांडी चांगली दिली नाहीत या कारणावरून तसेच चारित्र्याचा संशय घेवुन हैद्राबाद येथिल दवाखान्याच्या खर्चासाठी माहेरून ५०,०००/-रूपये घेवुन ये म्हणुन मला शिवीगाळ,मारहाण करून मला शारिरीक व मानसिक जाचहाट व छळ केला आहे **तपास:- मसफौ / मिरा पाटील** |